**<u>वादींतर्फे साक्षीदार क. २ ची सरतपासणी शपथेवर सुरु</u> -**

मी, तेजस्विनी नारायण वैद्य, वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम व मोडी लिपी तज्ञ, रा. कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, सत्यप्रतिज्ञेवर सांगते की,

**<u>वादी तर्फे सौ. आर. पी. नाईक, वकील</u> -**

१. मी महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागाचे मोडी लिपीचे प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे मला मोडी लिपीचे ज्ञान आहे. त्यामुळे मी सदर दाव्याचे कामी दाखल केलेले खरेदीखत, निशाणी ७५ , चे देवनागरी लिपीत लिप्यांतर केलेले आहे. *आता साक्षीदारास निशाणी ७५ चे खरेदीखत दाखविले.* मी लिप्यांतर ज्या दस्तऐवजाचे केले आहे, तो दस्तऐवज हाच आहे. आज रोजी मी त्याची लिप्यांतरीत प्रत सुध्दा हजर केलेली आहे. त्यातील मजकूर निशाणी ७५ प्रमाणेच आहे. त्याबद्दल मी त्याखाली सही व शिक्का केलेला आहे. तो दस्तऐवज **<u>निशाणी १०२</u>** वर आहे.

**<u>सर्व प्रतिवादीं तर्फे उलटतपास श्री. एस्. एस्. सावंत, वकील</u> -**

२. हे म्हणणे खरे आहे की, लिप्यांतर करण्यासाठी मी व्यक्तिश: न्यायालयाची परवानगी मागितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या अर्थाचा प्रतिज्ञापत्रातील मजकूर बरोबर नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिज्ञापत्रातील मजकूरावर मी न वाचता सही केलेली आहे. मी सदरकामी आज रोजी मी मोडी लिपी संबंधी जो अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे त्याचे प्रमाणपत्र हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ७५ मधील मजकूराप्रमाणेच मी लिप्यांतर करुन निशाणी १०२ चा दस्तऐवज हजर केला आहे, हे मी खोटे सांगत आहे.

**<u>फेरतपास</u>** - नाही.

**समक्ष -**

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : १० /०८ /२०१८**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-
**(कोमलसिंग राजपूत)**
**दि. न्या. क. स्तर, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

**कुडाळ**
**दिनांक : १० /०८ /२०१८**